पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 15/04/2022 (शुक्रवार)

---

## अफरातफर

**पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत इंदर खदान नं.६ कन्हान ते डुमरी सायडींग येथे दिनांक १२/०४/२२ चे १८.३० वा. ते दि. १३/०४/२२ चे ०८.०० वा. सुमारास एमएच– ३४/एबी– २३९९ क्रमांकाच्या ट्रकचा चालक आरोपी नामे– विजय चौहान रा.खदान नं. ६ कन्हान याने इंदर कॉलनी खदान येथुन दोन ट्रिप कोळसाचा एकुण वजन ५१ टन ४५० किलो कोळसा कि. २,५७,२५०/– रू. चा माल ट्रक मध्ये भरून तो डुमरी सायडींग येथे पोहोच न करता त्याचा अपहार केला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रविकांत रामदास कंडे वय ४२ वर्ष रा.चनकापुर कॉटर नं. २६/०१ खापरखेडा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ४०७ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार जयपाल सहारे मो.नं. ९३०९९६६३९२ हे करीत आहे.

## शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत ४५० कि. मी. अंतरावरील ममुराबाद लक्ष्मी नगर जळगाव येथे दिनांक ०५/०४/२०२२ चे ११.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– सौ कल्यानी राहुल पाटील वय २२ वर्ष रा. ममुरबाद जळगाव हिचे आरोपी क्र. १. राहुल पाटील, रा. ममुराबाद याचे सोबत रिती रिवाजाप्रमाणे लग्न झाले असुन तिला मुराबाद जळगाव येथे दिले. आरोपी १. राहुल पाटील रा ममुराबाद, २. सौ कनिशा पाटील ममुराबाद जळगाव व ३. योगेश पाटील ममुराबाद जळगाव हे फिर्यादीला वांरवार शारीरिक व मानसिक छळ करीत होते. आरोपी पती हा दारू पिन्याच्या सवइचे असुन दिनांक ११/०४/२०२२ रोजी सकाळी आरोपी पतीने फिर्यादीला २०० रू दे म्हंटले असता 'माझ्या कडे नाही' असे म्हटले असता पतीने मारहाण करायला सुरवात केली व नंतर सासु व दिराने सुदधा हातबुक्कीने मारहाण केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४९८ अ, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार यंगलवार मों न ९४२३२१९४२९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर